NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

परिपत्रक क्र. ५६/२०१८

सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा.प्राचार्य/प्राचार्या यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शै.वर्ष २०१८-१९ मधील ऑक्टो/नोव्हें-२०१८ या परीक्षा हंगामापासून बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी (बायो./इन्टर./ई.सी.एस), बी.बी.ए., बी.सी.ए., बी.ए.एल.एल.बी., बी., ऑर्किटेक्चर, बी.फार्मसी व एफ.ई ते बी.ई. या सर्व प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमातील सत्र २ मध्ये लोकशाही, निवडूणका व सुशासन (Democracy, Elections and Good Governance) या नवीन अभ्यासक्रमाचा समावेश शासनाच्या आदेशान्वये करण्यात आला आहे.

विद्या परिषदेची ३५ वी बैठक गुरुवार, दि.२१/०६/२०१८ रोजी संपन्न झाली असून त्यामधील विषय क्र.९३(२६) अन्वये लोकशाही, निवडूणका व सुशासन या अभ्यासक्रमाबाबत खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव :** | Democracy, Elections and Good Governance (लोकशाही, निवडूणका व सुशासन) या अभ्यासक्रमाची परीक्षा व मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर सोपविण्यास मान्यता देण्यात आली. |

त्याअनुषंगाने, ऑक्टोंबर/नोव्हेंबर-२०१६ या परीक्षा हंगामापासून ज्या प्रचलित पध्दतीने आजतागायत पर्यावरणशास्त्र (Environmental Science) या विषयाची परीक्षा अंतिम वेळापत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयस्तरावर आयोजित करण्यात आली आहे त्याप्रमाणे, लोकशाही, निवडूणका व सुशासन (Democracy, Elections and Good Governance) या विषयाची परीक्षा देखील आपल्या महाविद्यालयीन स्तरावर घेवून या दोन्ही पेपरची (विषयाची) तपासणी करुन त्याचे गुण परीक्षा झाल्यापासून ८ दिवसाच्या आत परीक्षा विभागाकडे सादर करावेत. सदरची परीक्षा सुरळीत व निकोपवातावरणात पार पाडावी.

मा.प्राचार्य/प्राचार्या यांनी सदरची बाब विद्यार्थी व परीक्षेशी निगडीत सर्व घटकांच्या निदर्शनास आणून घ्यावी व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन परीक्षेच्या कामकाजात विद्यापीठास सहकार्य करावे.

उपकुलसचिव
परीक्षा व मूल्यमापन विभाग

**प्रत:** १. मा.प्राचार्य/प्राचर्या, सो.वि.सो.
२. मूल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
३. परीक्षा विभागातंर्गत सर्व उप-विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

**संदर्भ : सोविसो/परीक्षा/वेळापत्रक/२०१८/** 2153

**दिनांक :** 11 SEP 2018